# कृषि पणन विषयक बातम्या : मे 2023

## ‘नाफेड’मार्फत उन्हाळ कांद्याची लवकरच खरेदी

### डॉ. भारती पवार : तीन लाख टन कांदा खरेदी होणार

अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा



लासलगाव, ता. निफाड : गतवर्षी एप्रिलमध्ये सोळा तारखेला उन्हाळ कांद्याची खरेदी सुरू झाली. यंदा एक महिना उलटून गेल्यानंतरही खरेदी सुरू झालेली नसल्याने त्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. ‘नाफेड’मार्फत उन्हाळ कांद्याची लवकरच खरेदी सुरू केली जाणार असल्याचे केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी सांगितले.

लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत शनिवारी (ता. २०) डॉ. पवार यांनी भेट दिली. याप्रसंगी त्यांनी माहिती दिली. यंदा तीन लाख टन खरेदीचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. या वर्षी लाल कांद्याला बाजारभाव नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांची भेट घेत टिकवण क्षमता कमी असलेल्या लाल कांद्याची ‘नाफेड’मार्फत प्रथमच खरेदी करण्यात आली आहे. आता उन्हाळ कांदा सुरू झाला असून, नाफेडमार्फत उन्हाळ कांदा खरेदीसाठी तयारी पूर्ण झाली आहे. लवकरच खरेदी सुरू होणार आहे. यामुळे बाजार समिती स्पर्धा निर्माण होईल आणि शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्यासाठी मदत होईल.

‘नाफेड’ची ओळख ही सर्वसामान्य शेतकऱ्यांना झाली आहे. चाळीस हजार टनांपर्यंत उन्हाळ कांद्याची खरेदी केली जात होती. गेल्या वर्षी अडीच लाख टन खरेदी झाली होती. यंदा तीन लाख टन खरेदी केली जाणार आहे. नाफेडबरोबर नाफेडच्या सब एजन्सी शेतकरी प्रोड्यूसर कंपनीही बाजार समितीतून कांद्याची खरेदी करतील यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत असेही मंत्री डॉ. पवार यांनी स्पष्ट केले.

#### ‘त्या’ खरेदीची रक्कम लवकरच

दोन महिन्यांपूर्वी ‘नाफेड’मार्फत लाल कांद्याची खरेदी करण्यात आली होती, पण अद्यापही लाल कांद्याचे पैसे अदा करण्यात आलेले नाहीत, पण कागदपत्रांची संबंधित नाफेडच्या सब एजन्सीकडून पूर्तता झाल्यानंतर लवकरच पैसे अदा केले जातील, असा विश्वास माध्यमांशी बोलताना केंद्रीय मंत्र्यांनी व्यक्त केला. बाजार समितीच्या माजी सभापती सुवर्णा जगताप, सचिव नरेंद्र वाढवणे, सहसचिव प्रकाश कुमावत, सर्व लिलाव प्रमुख सुनील डाचके, कांदा निर्यातदार व्यापारी मनोज जैन, शिवसेना तालुका प्रमुख प्रकाश पाटील, माजी प. स. सदस्य संजय शेवाळे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

Agrowon Dt. 22/05/2023

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात १ लाख ३५ हजार डझन आंब्यांची विक्री



- पुण्याच्या मार्केटयार्डात आयोजन
- ३१ मेपर्यंत चालणार 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजना

**पुणे** : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत भरविलेल्या आंबा महोत्सवात आतापर्यंत तब्बल १ लाख ३५ हजार डझन इतक्या आंब्यांची विक्री झाली आहे. पुण्याच्या गुलटेकडी मार्केटयार्डमध्ये दर वर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन सन २००२ पासून करण्यात येत आहे. चालू वर्षी आंबा महोत्सव महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे व जिल्हा परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गुलटेकडी, मार्केटयार्डमधील पीएमटी बसडेपोशेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत १ एप्रिलपासून सुरू केला आहे. या वेळी कोकणातील आंबा उत्पादकांबरोबरच सोलापूर व सातारा जिल्ह्यातील केशर आंबा उत्पादक आणि जिल्हा परिषदेकडील ग्रामीण विकास यंत्रणा विभागाकडील महिला बचत गटही सहभागी झालेले आहेत. या वेळी सुमारे ७० स्टॉल उत्पादकांना उपलब्ध करून दिले असून हापूस, केशर, पायरी आंबा तसेच बचत गटांच्या विविध प्रक्रियायुक्त उत्पादनांना पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. आतापर्यंत सुमारे १ लाख ३५ हजार डझन आंबा विक्री झाला आहे. सुरुवातीला आंब्याची बऱ्यापैकी आवक होती. परंतु, हवामान बदलामुळे अक्षय्यतृतीयेपासून आवक रोडावली होती. त्यामुळे दरही जास्त होते. आता आंबा महोत्सवाने चौथ्या टप्प्यात प्रवेश केला असून आवकही मोठ्या प्रमाणात वाढली आहे व दरही कमी झाले आहेत. साधारणपणे दर्जानुसार ४०० ते ७०० रुपये प्रति डझन या दरम्यान दर आहेत. महोत्सव दरवर्षीप्रमाणे ३१ मेपर्यंत चालू राहणार असून उच्च प्रतीचा हापूस व केशर आंब्याचा लाभ ग्राहकांनी घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांनी केले.

Punyanagari Dt. 21/05/2023

# अमेरिका, ब्रिटनच्या साहेबांनाही बारामतीच्या आंब्याची लागली गोडी

## बाजार समितीतून २०९ टन आंब्यांची निर्यात : ऑस्ट्रेलियालाही भुरळ


**प्रशांत ननवरे**

लोकमत न्यूज नेटवर्क


**बारामती :** कोविड काळात देखील आंबा निर्यातीचा उच्चांक गाठणाऱ्या कृषी उत्लन्न बाजार समितीने यंदाच्या वर्षी नवीन उच्चांक गाठण्याची तयारी सुरू ठेवली आहे. यंदा फळांचा राजा म्हटल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातल्या आंब्याची आजपर्यंत २०९ टन निर्यात झाली आहे. बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती आणि रेनबो इंटरनॅशनल एक्स्पोर्टने ३० जूनपर्यंत १०० टन आंब्यांची निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

कोकणातील देवगड हापूस, केशर, बदाम यांसारखे आंबे परदेशात अधिक लोकप्रिय होत आहेत.

**निर्यातीसाठी शेतकरी दर**

(प्रतिकिलो)

हापूस २४० रुपये

केशर १८० रुपये



आतापर्यंत २०९ टन आंबा विमानाने ऑस्ट्रेलिया, अमेरिका, इंग्लंडला पाठविला आहे. यंदाच्या हंगामात जवळपास १००० टन आंब्याच्या निर्यातीचे उद्दिष्ट बाजार समितीने ठेवले आहे. बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती निर्यातक्षम आंबा उत्पादकांचा आधार बनली आहे. यंदा महाराष्ट्रातील देवगड हापूस, केशर आणि पायरी, तर कर्नाटकातील बदाम निर्यात होत आहेत. आंब्यांच्या निर्यातीसाठी २३० ग्रॅम वजनाचा हापूस, २३० ग्रॅम वजनाचा केशर आणि २५० ग्रॅम वजनाचा बदाम निवडला जात आहे. इंग्लंडसाठी निर्यात केलेल्या फळांना गरम पाण्याची (हॉट वॉटर ट्रिटमेंट) प्रक्रिया केली जाते आणि अमेरिकेत निर्यात केलेल्या फळांवर विविध पॅरामीटर्सच्या चाचणीनंतर 'विकिरण उपचार' केले जातात. मग हा आंबा आकर्षक पद्धतीने पॅकिंग करून आकर्षक पद्धतीने निर्यात केला जातो.


Lokmat Dt. 12/05/2023